म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वा. वा.
ग्र. क्र. २९९९

# सैराब आणि इस्लाम

IRBK-0102999
IRBK-0102999

इंदुमती




म. ग्रं. सं. ठाणें
विषय
वा. नं.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
वा. नं.

# सोराब आणि रुस्तुम

११ MAY 1976
11 MAY 197

: लेखिका :

इंदुमति जगताप

IRBK-0102999
IRBK-0102999

जगताप पब्लिशिंग हाउस, पुणे.

प्रकाशक:

जयवन्त बाबुराव जगताप
बी. ए. (ऑनर्स); बी. टी

संचालक जगताप पब्लिशिंग हाऊस
१२४८ शुक्रवार पेठ, पुणें २.

मुद्रक:

आर. बी. देशमुख
मराठा प्रिंटिंग प्रेस,
७७ वेताळ पेठ, पुणें २.

चित्रकार:

रघुवीर मुळगांवकर, मुंबई.

किंमत ५ आणे

किंमत ६ आणे

ग्रं·भा·वा. २८४ २५/३/५

## : १ :

## रुस्तुमचें बालपण

फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट ! पर्शिया या देशांत सॅम नांवाचा एक मोठा लढवय्या होऊन गेला. फक्त पर्शियांतच नव्हे तर सर्व देशांत त्याचें नांव दुमदुमून गेले होते. त्याला एकुलता एक मुलगा होता. त्याचे केस हंसाच्या पंखाप्रमाणें सोनेरी होते. सॅमच्या बायकोचें आपल्या मुलावर खूप प्रेम होते. आपल्या मुलाचें नांव तिनें मोठ्या आवडीनें 'झाल' असें ठेवले होते.

एके दिवशीं एका ज्योतिष्यानें त्याचे ते रुपेरी केस पाहून असें भविष्य वर्तविले कीं हा मुलगा शत्रूचा प्रदेश तर मिळवूं शकणारच नाहीं पण स्वतःचा देश मात्र गमावून बसेल. तो स्वतःवर व देशबांधवावर मोठें संकट ओढवून घेईल.

झालच्या आई-बापाचें त्याच्यावर प्राणापलिकडे प्रेम होते. पण मायदेशावर त्याहिपेक्षां अधिक प्रेम होते. एके दिवशीं सॅमनें कसलासा निश्चय केला. अपरात्रीं झालला त्याच्या आईच्या कुशींतून हळूच उचलले. घरांतून बाहेर पडेपर्यंत त्याला कसलेच भान नव्हते. गांवाची हद्द ओलांडल्यावर त्याच्या जिवांत जीव आला. खूप खूप लांब गेल्यावर त्याला एल्बुर्झ या नांवाचा एक डोंगर दिसला. तेथेंच त्यानें झालला सोडून दिलें आणि मागच्या पावलींच तो घराकडे परतला.

सकाळीं झाल जागा झाला. अनोळखी ठिकाण पाहून तो घाबरला-रडूं लागला. इतक्यांत एक विचित्र प्राणी त्याच्याजवळ आला. विचित्र म्हणण्याचें कारण त्या प्राण्याचें अंग व पाय सिंहासारखे होते व डोकें आणि पंख होते गरुडाप्रमाणें ! त्याला ग्रिफन म्हणत. झालला रडतांना पाहून ग्रिफन त्याच्याजवळ आला. त्यानें त्याला फळें आणून दिलीं. पोट भरल्यावर झाल वनांतील प्राण्यांशीं खेळूं लागला.

कांहीं वर्षें ग्रिफननें झालचें उत्तम प्रकारें संगोपन केलें. पुढें त्यानें झालला त्याच्या वडीलांच्या स्वाधीन केले. झालच्या वडीलांना आपल्या वर्तनाबद्दल पश्चाताप झालेलाच होता. झालचा त्यांनीं मोठ्या आनंदानें स्विकार केला.

झालला लढाईचें शिक्षण देण्यांत आले. लवकरच एक उत्तम योद्धा म्हणून त्याची वाहवा होऊं लागली: त्यानें मोठमोठाली धाडसांचीं कामें करून सर्व जगाला आश्चर्यचकित केले. पुढें लवकरच काबूलची राजकन्या रुदाबा इच्याबरोबर त्याचें लग्न झाले. इच्यापासून झालला एक मुलगा झाला. त्याचें नांव 'रुस्तुम' असें ठेवण्यांत आलें.

रुस्तुमसारखा सशक्त, मोठा आणि चमत्कारिक मुलगा कोणी कधींच पाहिला नव्हता. ज्या दिवशीं तो जन्मला त्या दिवशीं तो एक वर्षाचें मुलाएवढा दिसत होता. दहा दायांचें दूध तो एकटा पीत असे.

झालनें हुबेहुब रुस्तुमसारखा एक पुतळा तयार करवून घेतला. पुतळ्याला रेशमी कपडे घालण्यांत आले. त्याचें हात उत्तम योद्धासारखे दाखविले असून त्याला घोड्यावर बसविलेला होता.

रुस्तुमच्या जन्माचें वेळीं सॅम युद्धाकरितां पर्शियांतच पण दुसऱ्या एका भागांत गेला होता. त्याच्याकडे हा पुतळा पाठविण्यांत आला. रुस्तुम-सारखे सुलक्षणी बालक जन्माला आलेला पाहून त्याला खूप आनंद झाला.

असें म्हणतात कीं ज्यावेळीं रुस्तुम हा तीन वर्षांचा झाला तेव्हां तो मोठ्या माणसाप्रमाणें घोड्यावर बसूं लागला. जेव्हां पांच वर्षांचा झाला तेव्हां तो मोठ्या माणसाप्रमाणें खाऊं लागला. आणि आठव्या वर्षीं तर तो एक लढवय्या बनला. तो खूपच सुंदर दिसे. त्याची बरोबरी कोणीच करूं शकत नव्हते.

आपला शक्तिमान नातू आपण केंव्हां एकदां पहातो असें सॅमला होऊन गेले. तेंव्हां तो झाबुलीस्थानकडे निघाला. कारण त्यावेळीं झाल हा झाबुलीस्थानचा गव्हर्नर होता. सॅम आपल्याला भेटायला येत आहे हें पाहून झाल आपला पुत्र रुस्तुमसह त्याला सामोरा गेला. त्यावेळीं रुस्तुम हत्तीवर आरुढ झाला असून त्यानें तेजस्वी मुगूट धारण केला होता.

सॅमनें जेंव्हां त्या मुलाला पाहिले तेंव्हां तो खूप आश्चर्यचकीत झाला व त्याला खूप आनंदहि झाला. नंतर त्यानें सर्व लोकांना मोठी मेजवानी दिली. मेजवानीनंतर त्यानें देवाची प्रार्थना केली कीं, "देवा ! मोठेपणीं रुस्तुमला जुलमी राजा होऊं देऊं नकोस. त्याला धर्मशील व दयाळू निपजूं दे. एक आदर्श राजा म्हणून त्याचा गौरव होऊं दे."

: २ :

## रक्ष

एकदां तार्तर लोकांचा पुढारी राजपुत्र ॲफ्रासिब यानें मोठ्या सैन्यानिशीं पर्शियावर स्वारी केली. तो चालून येत आहे हें पाहून पर्शियन लोकांचें धाबे दणाणले. त्यावेळचा पर्शियाचा राजा हा राज्य करण्यास अगदीं नालायक होता. तेंव्हां पर्शियांतील सर्व लोकांनीं झालकडे मदतीची मागणी केली. त्यानें ती गोष्ट आनंदानें कबूल केली.

पुढाऱ्यांच्या विनंतीला मान्यता दिल्यानंतर झालनें सैन्याची एक तुकडी तयार केली. आणि त्याच्यावर रुस्तुमला सेनापती नेमले. त्याला खात्री होती कीं आपल्या मुलाचें अंगीं हत्तीइतकें बळ आहे. रुस्तुमला लढाईचें ज्ञान देण्यांत झालनें खूपच कष्ट घेतलें होतें. रुस्तुम हा आपल्या बापापेक्षां शूर व हुषार होता. आपला मुलगा आपल्यापेक्षां कांकणभर

सरस झालेला पाहून कुठल्या आईबापांना आनंद वाटणार नाहीं ? आपल्या पोटीं असा मुलगा जन्माला आल्याबद्दल झालनें ईश्वराला धन्यवाद दिले.

रुस्तुमनें युद्धाकरितां भाला व गदा यांची वडिलांच्याजवळ मागणी केली. ही गदा आणि भाला त्याचे आजोबा सॅम यांच्या मालकीची होती. त्यानें ती उचलून पाहिली. तेव्हां त्याला असें दिसून आढळून आले कीं ती गदा अगदीं आपल्यास झेपेल अशीच आहे. आनंदानें तो स्वतःशीं हंसला. त्यानें ती गदा हातांत घेऊन गरगर फिरविली. वडिलांना लवून आदरानें नमस्कार केला. आणि तो वडीलांना म्हणाला—

"बाबा, ही गदा ज्याप्रमाणें तुम्ही मला दिली, त्याचप्रमाणें त्या गदेला साजेसा असा एक घोडा द्या. नुसत्या गदेच्या जोरावर मी शत्रूवर जय मिळवूं शकणार नाहीं."

झालजवळ जेवढे घोडे होते ते सर्व त्यानें छोट्या रुस्तुमला दाखविले. त्यांपैकीं कांहीं सुंदर होते कांहीं चपळ होते, तर कांहीं बलवान होते. पण रुस्तुमला योग्य असा एकहि घोडा त्याला दिसेना.

इतक्यांत पलिकडच्या बाजूनें एक घोडी चाललेली त्याला दिसली. तिच्याबरोबर एक उमदा घोडाहि होता. त्याचें अवयव भरीव व उठावदार दिसत होते, त्याच्या अंगावर ठिपके होते. शरीर तर रेशमाप्रमाणें चकाकत होते. अशा त्या घोड्याला पाहून रुस्तुमला खूप आनंद झाला. रुस्तुमचे वडील त्याला म्हणाले—

"बाळ रुस्तुम! तूं अगदीं योग्य असाच घोडा शोधून काढला आहेस. याचें नांव रक्ष. हा तुला कदापिही धोका देणार नाहीं. पण ज्या ज्या लोकांनीं याला धरण्याचे प्रयत्न केले त्या सर्वांना या घोडीनें यमसदनाची वाट दाखविली आहे."

वडीलांचें हें बोलणें ऐकून रुस्तुम आनंदानें बेहोष झाला. त्यानें एकदम घोड्यावर दोरीचा फास फेकून घोडा पकडला. जणूं कांहीं वडीलांना त्यानें प्रत्युत्तरच दिलें. पण इतक्यांत ती घोडी उधळली. तिचे दांत इतकें कांहीं भयंकर दिसत होते कीं ही वाघीणच आहे कीं काय असें पहाणाराला वाटावे. घोडी आपल्यावर चालून येत आहे हें पाहून तो जोरानें ओरडला. भीतीनें नव्हे तर वीरश्रीनें! दांत ओठ खात व जोरानें ओरडत तो त्या घोडीवर चालून गेला. थोड्याच वेळांत रुस्तुमनें आपल्या अजस्र शक्तीनें घोडीला जखडून टाकिलें.

रुस्तुमचा आनंद गगनांत मावेना. त्यानें रक्षाचे पाठीवर खोगीर चढविला आणि तो स्वार झाला. नंतर तो वडिलांकडे वळून म्हणाला,

"बाबा, शेवटीं मला पाहिजे होता तो घोडा मी मिळविला. आतां मी आणि रक्ष पर्शियाच्या संरक्षणार्थ लढण्यास तयार आहोंत!"

## : ३ :

## कैकॉस

सर्व तयारी झाल्यावर रुस्तुम तार्तर लोकांच्यावर चालून गेला. त्यांचें तुंबळ युद्ध सुरूं झालें. घोड्यांच्या टापांच्या आवाजामुळें पृथ्वी हादरुन गेली. नगाऱ्याच्या आवाजानें, शस्त्रांच्या खणखणाटानें आणि लोकांच्या किंकाळ्यानें दाहिदिशा दुमदुमून गेल्या.

जेव्हां प्रथम अफ्रासिबनें रुस्तुमला पाहिलें तेव्हां त्याचे डोळे दिपून गेले. त्याच्याजवळच उभ्या असलेल्या मंत्र्याला त्यानें विचारलें,

"काय हो मंत्री, हा कोण?"

मंत्र्यानें उत्तर दिलें—

" ह्याला तुम्ही ओळखले नाहीं काय ? याचें नांव रुस्तुम. प्रसिद्ध लढवय्या झाल याचा हा मुलगा. त्याच्या हातांत त्याच्या आजोबाची विजयी गदा आहे; ती तुम्ही पाहिली नाहीं काय ? यश आणि कीर्ति मिळविण्यासाठीं तो ह्या युद्धांत पडला आहे. "

इतक्यांत रुस्तुम त्याच्यापुढें येऊन उभा राहिला. दोघांची निकराची लढाई सुरू झाली. लढाई ऐन रंगांत आली. कोणीच हार जाईना. इतक्यांत रुस्तुमनें राजाच्या कंबरपट्ट्यांत हात घातला आणि त्याला घोड्यावरून खालीं ओढले. त्यास वाटलें कीं शत्रूस फरफडत ओढून पर्शियाच्या राजापुढें न्यावा आणि आपल्या विजयाची ग्वाही द्यावी.

पण अफ्रासिबचा पट्टा तुटून तो खालीं पडला; तेव्हां त्याचें सर्व सैनिक त्याच्याभोंवतीं गोळा झाले. रुस्तुमनें ही गर्दी मोडून टाकली. अफ्रासिबच्या डोक्यावरचा मुगूट त्यानें मोठ्या कुशलतेनें काढून नेला. जणूं कांहीं त्याचे हक्क रुस्तुमनें हिरावून नेले. त्यावेळीं रुस्तुमचा चेहरा असा निश्चयी व भव्य दिसत होता कीं त्याला कोणीच अडवूं शकले नाहीं. सिंहाच्या छाव्याला कोण अडविणार ?

रुस्तुमसारखे लोक ज्या राज्यांत आहेत त्या पर्शियाच्या राजाशीं आपण स्नेह जोडावा असें अफ्रासिबला वाटले. त्यामुळें पुढें पुष्कळ दिवसपर्यंत ही लढाई बंद होती.

ह्या लढाईनंतर कांहीं दिवसांनीं पर्शियाचा राजा कैकोबाद हा मरण पावला. तेव्हां त्याचा थोरला मुलगा कैकॉस हा राजा झाला. तो आपल्या वडीलाप्रमाणें हुशार नव्हता. मेजवान्या व आनंदोत्सव यांतच तो नेहमीं दंग असे. केवळ तो पर्शियाचा राजा होता म्हणूनच लोक त्याला मान देत होते. पण त्याला मात्र आपल्यापेक्षां या जगांत कोणीही श्रेष्ठ नाहीं असें वाटत होते.

त्यावेळीं पर्शियापासून खूप दूर अंतरावर मॅझिनडरन नांवाचा एक खूप सुंदर देश होता. जणूं कांहीं सौंदर्याचा आगरच! पण तो देश भुताटकीनें व्यापलेला होता. त्या देशावर राक्षसांचा अंमल चाले. या देशावर स्वारी करण्याचा कैकॉसनें निश्चय केला. वास्तविक पहातां ही गोष्ट त्याच्या आवाक्याबाहेरची होती. आतांपर्यंत पर्शियाच्या कुठल्याहि राजानें किंवा योद्ध्यानें मॅझिनडरनवर स्वारी करण्याचा प्रयत्न केला नव्हता. तेव्हां असा या देशावर स्वारी न करण्याचा सल्ला कैकॉसच्या मंत्र्यानें त्याला दिला.

पण कैकॉसनें त्यांच्याकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. भुताटकीच्या विद्येंत प्रवीण असलेल्या राक्षसांची त्यानें मुळींच पर्वा केली नाहीं. राज्याची सर्व व्यवस्था झाल व रुस्तुम या दोघांवर सोपवून तो आपल्या सैन्यासह मॅझिनडरन देशाकडे निघाला.

जेव्हां तो मॅझिनडरनला जाऊन पोंचला तेव्हां त्याचा गर्व क्षणांत गेला व लालसा पार नष्ट झाली. राक्षसाचें सैन्य पाहूनच त्याची गाळण उडाली. राक्षसांनीं त्याच्यावर भयंकर वादळ सोडलें; त्यामुळें कैकॉसच्या सैन्यांत गोंधळ माजला. हजारों लोकांची अंधारांत चूकामूक झाली. कित्येक लोक मृत्यूमुखी पडले आणि बरेच पळून गेले. जसजसी सकाळ होऊं लागली तसतसा वादळाचा जोर कमी होऊं लागला. सकाळीं सर्वत्र सामसूम झाली. कैकॉस उठून पाहतो तों त्याची दृष्टी गेल्याचें त्यास समजले. इकडे तिकडे पाहूं लागला तेव्हां आपलें सैन्य मारले गेले असून बाकीचे कैदी झाले आहे असें त्याला दिसून आले. कैदी झालेल्या सर्व शिपायांचे डोळे त्याच्याप्रमाणेंच गेलेले होते. त्याचा सर्व खजिना लुटून नेण्यांत आला होता.



२००९

इतक्यांत शत्रूकडील सैन्यानें त्याच्याभोवतीं गराडा घालून त्याला आपल्या राजाकडे नेले. त्याच्यावर सक्त पहारा ठेवण्यास सांगितलें. ही सर्व हकिगत पर्शियांत कळावी म्हणून त्यानें खूप प्रयत्न केले. परंतु एकदां मात्र त्याला ही सुसंधी मिळाली व त्यानें लढाईची हृदयद्रावक बातमी झालकडे पाठविली.

झालला ही बातमी कळतांच रुस्तुमकडे त्यानें ही कामगिरी सोपविली. रक्षासह मॅझिनडरनला जाण्यास रुस्तुम निघाला. जेव्हां तो वडीलाचा आशीर्वाद घेण्यास झालकडे गेला तेव्हां तो म्हणाला—

"बाबा मॅझिनडरनचा प्रवास खूप लांबचा आहे. एवढा प्रवास करण्यास राजाला सहा महिने लागले. तुम्हाला जवळचा मार्ग माहीत आहे कां?"

"आहे ना एक जवळचा रस्ता. राजानें लांबच्या रस्त्यानें प्रवास केला; कारण तो रस्ता लांब पण सरळ आणि सोपा होता. जवळच्या रस्त्यानें सात दिवसांत मॅझिनडरनला जातां येते. पण तो रस्ता खूप अवघड आहे. वाटेंत मोठमोठाले डोंगर आहेत. क्रूर लोकांच्या टोळ्या तेथें आहेत. अजून कुणीही मानवप्राणी ही वाट ओलांडू शकला नाहीं."

"बस्स बाबा, मग मी याच रस्त्यानें जाणार. जे कुणाला करतां आले नाहीं तें मी करून दाखवीन. मला तुमचा उभयतांचा आशीर्वाद द्या. तो आशीर्वाद माझा मार्ग सुखकर करील" असें म्हणून रुस्तुमनें माता-पित्यांना वंदन केले.

रुस्तुमच्या आई-वडीलांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. पुत्रास त्यांनीं मंगल आशीर्वाद दिला. देशासाठीं प्राण धोक्यांत घालणाऱ्या त्या वीर-पुत्राला त्यांनीं शुभाशीर्वाद दिला.

: ४ :

## रुस्तुमचें धाडस

रुस्तुम दिवसभर प्रवास करीत होता. सूर्य अस्ताला जाऊन अंधार पडूं लागला. रुस्तुम एका अरण्याचे मध्यभागीं येऊन पोहोंचला. पुढची वाट दिसेनाशी झाली तेव्हां तो रक्षावरून खालीं उतरला. रक्षाच्या अंगावरचें खोगीर व लगाम काढून ठेवून त्यानें त्याला मोकळे केले. नंतर रुस्तुमनें तलवार एका बाजूला काढून ठेवली व दगडाची उशी करून तो झोपीं गेला. दिवसभराच्या श्रमानें त्याला निद्रादेवीची आराधना करावी लागली नाहीं.

मध्यरात्रीं एका अक्राळविक्राळ सिंहानें रक्षावर जोराचा हल्ला केला. रक्ष देखील दांत ओठ खात त्यांच्यावर चालून गेला. त्या दोघांच्या ओरडण्यामुळें रुस्तुम जागा झाला. तों त्याला काय दिसले? बाजूला सिंह मरून पडलेला होता. त्याला पाहून रुस्तुम रक्षाला म्हणाला, " हे रक्षा, माझ्या मदतीशिवाय तूं सिंहावर कां चालून गेलास? तूंच जर दुर्दैवानें मारला गेला असतास तर मला एकट्यालाच मॅझिनडरनला पायीं जावे लागले असते. आतां पुनः असें करूं नकोस, जेव्हां संकट येईल तेव्हां तूं मला खिंकाळून जागे कर. "

दुसऱ्या दिवशीं दिवसभर वाट चालून रात्रीं रुस्तुम एका झाडाखालीं झोंपला. त्याही रात्रीं एक विचित्र हिंस्र पशु रक्षावर चालून आला. त्याचें अर्धे अंग राक्षसाचें व अर्धे अंग सापाचें होते. रक्ष जोरानें ओरडूं व नाचूं लागला. त्याचें ओरडणें ऐकून रुस्तुम जागा झाला. त्यानें जोरानें आपली तलवार उपसली. पण तो प्राणी एकदम गुप्त झाला.

रुस्तुम पुनः झोपीं गेला. तो विचित्र प्राणी परत आला. रक्षानें रुस्तुमला उठविले. रुस्तुमनें इकडे तिकडे पाहिलें पण त्याला कांहींच

दिसलें नाहीं. तो रक्षावर खूप रागावला. तो रक्षाला म्हणाला,

" रक्ष, पुनः मला विनाकारण उठविलेस तर याच तलवारीनें तुझें डोकें उडवीन."

नंतर पुनः रुस्तुम गाढ झोपीं गेला. रक्ष एकाद्या प्रामाणिक नोकराप्रमाणें मालकाच्या उशाशीं बसून राहिला. पुनः तो विचित्र प्राणी तेथें आला. त्याला पहातांच रक्ष आपल्या खुरानें जमीन उकरूं लागला. त्यामुळें रुस्तुमला जाग आली. यावेळीं मात्र तो प्राणी रुस्तुमच्या नजरेस पडला. त्याला पहातांच रुस्तुमनें त्यावर तलवारीनें प्रहार केला. दोघांची झटापट सुरूं झाली. तो प्राणी खूप मोठा व सशक्त होता. आपल्या मालकावर आलेलें संकट पाहून रक्ष देखील त्याच्यावर तुटून पडला. रक्ष त्याला चावला. त्यानें त्याची खवल्याप्रमाणें असलेली कातडी फाडला. त्यामुळें रुस्तुमला तो प्राणी सहज मारतां आला.

अशा रीतीनें हें दुसरें संकट पार पडलें. पुढें अनेक संकटांना तोंड देत रुस्तुम मॅझिनडरनला येऊन पोहोंचला. जेव्हां त्यानें शहरांत प्रवेश केला तेव्हां रक्ष जोरानें खिकाळला. हा आवाज कैकॉस राजानें तुरुंगांतून ऐकला. त्याला खूप आनंद झाला. तो आपल्या सेवकांना म्हणाला,

" ऐकलांत ना रक्षाचा आवाज ? रुस्तुम आला वाटते. आतां आपण लवकरच मुक्त होणार."

रुस्तुम राजाला भेटावयास गेला तेव्हां राजा बागेंत एकटाच बसला होता. पहारेकरी पण कुठे दिसत नव्हते. राजानें रुस्तुमला पाहिले. त्याचे अंतःकरण उचंबळून आले. त्याला खूप आनंद झाला. पण राजाला दिसत नव्हते. श्वेत राक्षसानें त्याला आंधळे केले होते. कैकॉसनें सर्व हकिगत रुस्तुमला सांगितली. तो म्हणाला—

" रुस्तुम, तूं माझ्या सुटकेसाठीं प्राणाला न जुमानतां इथें आलास. कसें फेडूं मी तुझें हें उपकार ? पण रुस्तुम माझ्यासाठीं आणखी एक साहस करशील कां ? या राक्षसांचा राजा श्वेत राक्षस त्याला मारून त्याच्या हृदयांतील रक्ताचें थेंब जर आमच्या डोळ्यांत आणून टाकशील तर आम्हांला पुनः दृष्टी प्राप्त होईल."

रुस्तुमनें ही गोष्ट आनंदानें कबूल केली.

श्वेत राक्षस सात पर्वतापलिकडे राहात होता. अगदीं खोल व भीतिदायक अशा एका अंधाऱ्या गुहेंत तो रहात होता. त्याचा समाचार घेण्यासाठीं रुस्तुम निघाला. वाटेंत त्याला अनेक राक्षसांनीं अडविलें. त्या सर्वांचा त्यानें शिरच्छेद करून टाकला. सात पर्वत ओलांडल्यावर त्याला गुहा कुठेंच दिसेना. कारण सर्वत्र अंधार पसरला होता. तो तसाच पुढें गेला तों त्याला एक गुहा दिसली. त्यावेळीं राक्षस झोंपला होता. त्याच्या घोरण्यानें सर्व अरण्य दणाणून गेलें होतें. रुस्तुम जोरानें ओरडत आंत शिरला. त्यामुळें श्वेत राक्षस उठला. लहानशा रुस्तुमला पाहून तो तिरस्कारानें म्हणाला,

" कोण रे तूं ? "

" माझें नांव रुस्तुम. माझे वडील झाल यांच्या आज्ञेवरून मी येथें आलों आहे. सुप्रसिद्ध लढवय्या सॅमचें नांव तूं ऐकलें आहेस कां ? त्याचा मी नातू." राक्षसाच्या प्रश्नाला उत्तर मिळालें.

तें ऐकून राक्षस मनांत चरकला. पण न घाबरतां त्यानें जवळच असलेलें एक भलें मोठें गिरणीचें चाक रुस्तुमच्या अंगावर भिरकाविलें. रुस्तुमनें मोठ्या कुशलतेनें तें चुकविलें. आणि तलवार उपसून तो शत्रूवर चालून गेला.

दोघांची झटापट सुरू झाली. त्या तुंबळ लढाईनें गुहा हादरून गेली. त्या श्वेत राक्षसाच्या किंकाळ्यांनीं दऱ्याखोऱ्या भरून गेल्या. पण रुस्तुम घाबरला नाहीं आपली सर्व शक्ति एकवटून त्यानें राक्षसाचें हात धरले आणि त्याला जमिनीवर आपटले. राक्षस उठण्यासाठीं धडपड करूं लागला. परंतु तो उठण्याचें आंतच रुस्तुमच्या तलवारीनें त्याचें डोकें धडावेगळे केलें. रुस्तुमनें एक लहानशी शिशी भरून त्याच्या हृदयांतील रक्त काढून घेतले.

रुस्तुमचें काम झालें! तो त्या भयंकर गुहेच्या बाहेर पडला. जवळच वहात असलेल्या एका स्वच्छ ओढ्याच्या पाण्यांत त्यानें हात धुतले. ईश्वराचें आभार मानले आणि पुनः मॅझिनडरनकडे निघाला.

मॅझिनडरनला आल्यावर त्यानें शिशींतील रक्ताचा एकेक थेंब राजाच्या व इतर सेवकांच्या डोळ्यांत घातला त्यामुळें त्यांना पूर्ववत् दिसूं लागले.

अशा रीतीनें मॅझिनडरन पर्शियानें जिंकले. रुस्तुमची सर्वत्र वाहवा होऊं लागली.

## : ५ :

## सोराब

एके दिवशीं रुस्तुम शिकारीसाठीं अरण्यांत गेला होता. शिकारी नंतर तो खूप दमला आणि तेथेंच लवंडला. थोड्याच वेळांत गाढ झोप लागली त्याला. रक्ष जवळच चरत होता. त्याला तार्तर लोकांच्या टोळीनें पकडले. त्याला त्यांनीं सॅमनगमच्या राजाकडे नेला. घोड्याचा तपास करीत करीत रुस्तुम सॅमनगमच्या राजाकडे गेला. राजानें मोठ्या थाटानें त्याचें

स्वागत केले. कांहीं दिवस सॅमनगमला रहाण्याची त्याला विनंती केली. रुस्तुम म्हणाला, " राजा, माझ्या रक्षाला तुझ्या लोकांनीं धरून आणले. त्याला अगोदर माझ्या स्वाधीन कर, तो माझा प्राण आहे. त्याच्यापुढें मला सर्व जग तुच्छ आहे. "

राजा म्हणाला, " तो घोडा तुझा आहे हें माझ्या सेवकांना माहित नव्हते. मला क्षमा कर ".

रुस्तुमला राजानें त्याचा घोडा परत दिला. रुस्तुमनें त्याच्या विनंतीचा स्वीकार करून तेथें राहूं लागला. सॅमनगमच्या राजाची तेहमिना नांवाची एक सुंदर मुलगी होती. तिचें लग्न राजानें आपण होऊन रुस्तुमशीं लावून दिलें.

कांहीं दिवस मजेंत घालविल्यावर रुस्तुम पर्शियाला जाण्यास निघाला. पत्नीचा निरोप घेतेवेळीं तो म्हणाला—

" प्रिये, तुझ्यापोटीं जर मुलगी झाली तर तिच्या केसांत हा ताईत बांध म्हणजे दुःखापासून तिचें रक्षण होईल. आणि जर तुला मुलगा झाला तर दंडावर बांध. त्यामुळें पूर्वजाप्रमाणें तो शूर वीर बनेल, धाडशी होईल. "

रुस्तुम निघून गेला. इकडे योग्यवेळीं तेहमिना प्रसूत झाली. सूर्य नारायण वर आला आणि नूतन बालकानें जगांत प्रवेश केला. राजाला नातू झाला. सर्वत्र आनंदोत्सव साजरे केले गेले. पण तेहमिनाला मात्र वाईट वाटले. आतां आपला बाळ बापाकडे जाणार. आपल्याप्रमाणें पति त्याला योद्धा करील. पुढें तो मोठमोठ्या लढायावर जाईल आणि आपली ताटा-तूट होईल. या भीतीनें तिनें मुलगी झाली असा निरोप पाठविला.

रुस्तुमनें आपल्या मुलीला व पत्नीला मौल्यवान दागिने व उंची कपडे पाठविले. पण मुलगी झालेली पाहून त्याची खूप निराशा झाली.

आपल्या अपत्याबद्दल त्यानें पुढें कसलाहि विचार केला नाहीं किंवा सॅमनगमला तो पुनः गेला नाहीं.

इकडे मुलाचें नांव 'सोराब' असें ठेवण्यांत आले. वर्षामागून वर्षे निघून गेली. सोराबला आतां अकरावें वर्ष लागले होते. पण पिता पुत्राची भेट एकदांही झाली नव्हती.

एके दिवशीं सोराब आईला म्हणाला,

"आई, माझे बाबा कोण ग? माझे मित्र नाना शंका घेतात. सांग ना कोण माझे बाबा? मी त्यांना अजून पाहिले नाहीं. कुठें भेटतील मला ते?"

तेहमिना म्हणाली—"बाळ, तुझ्या वडिलांचें नांव रुस्तुम असें आहे. त्याच्यासारखा पराक्रमी वीर पृथ्वीच्या पाठीवर दुसरा कोणी सांपडणार नाहीं."

आणि मग तिनें आपल्या मुलांस नवऱ्याच्या वीरकथा ऐकविल्या. बापाच्या त्या कथांनीं मुलांच्याही अंगांत वीरश्रीचे वारे शिरले. आपण आपल्या बापाची गांठ घ्यावी असें त्यास वाटूं लागले. त्याचें मन आपो-आपच रुस्तुमकडे ओढले जाऊं लागले.

मुलाची इच्छा पाहून तेहमिना डोळ्यांत आसवे आणून म्हणाली, "बाळ त्यांना जेव्हां तुझी ओळख पटेल तेव्हां ते तुला कदापिही मजकडे धाडणार नाहींत आणि मग तुझ्या विरहानें मी क्षणभर देखील जगणें शक्य होणार नाहीं."

शेवटीं सोराबनें आपला हट्ट पुरा केला. बापाच्या भेटीसाठीं तो घराबाहेर पडला.

सर्व देश त्यानें तुडविले पण वडील त्याला दिसले नाहींत. प्रवास करतां करतां तो तार्तर लोकांच्या राज्यांत गेला. तार्तराच्या राजानें—अफ्रा-

सिबनें त्याचें स्वागत केले. अफ्रासिब पर्शियावर स्वारी करण्याचा तयारीत होता. आपल्या या स्वारींत सोराबची मदत खात्रीनें होईल म्हणून त्यानें सोराबशीं सख्य केलें.

अफ्रासिब आपल्या सैनिकांना म्हणाला,

" या युद्धांत सोराब व रुस्तुम एकत्र आले पाहिजेत. मात्र ते एक-मेकांना ओळखतां कामा नये. हा आपला मुलगा आहे असें रुस्तुमला समजले तर तो लढणार नाहीं. इकडे सोराबची सुद्धां तिच स्थिती होईल. रुस्तुम म्हातारा झाला आहे. तेंव्हां सोराब हाच खात्रीनें विजयी होणार. रुस्तुमच्या मागें आपल्याला फक्त सोराब हाच शत्रू उरला. त्याचा हां हां म्हणतां कांटा काढूं. मग पर्शिया माझाच होणार !"

अफ्रासिबचा हुकूम मिळतांच तार्तर सैन्य सोराबला जाऊन मिळाले. नंतर हें प्रचंड सैन्य पर्शियाकडे निघाले. त्यांना वाटेंत ज्यांनीं विरोध केला त्या सर्वांचा त्यांनीं मोड केला. ही बातमी कैकॉसला सम-जली. शिवाय पर्शियावर चालून येणारा हा योद्धा अवघा १४ वर्षांचा आहे हें ऐकून त्याला खूप आश्चर्य वाटले. सैन्याला त्यानें इशारा दिला. प्रत्येकजण घराबाहेर पडला. देशासाठीं वीर सिद्ध झाले.

पण सोराबला पर्शिया जिंकायचा नव्हता. त्याला पित्याला भेटा-यचे होते. त्यानें राजाला निरोप पाठविला.

" राजा, मला या युद्धांत लाखों लोकांचा संहार करायचा नाहीं. तुमच्या बाजूचा वीर येऊं द्या. आमच्याकडील एक वीर येईल."

सोराबचा निरोप ऐकून राजा घाबरला. कां घाबरला तो ? द्वंद्व युद्धाला रुस्तुमशिवाय दुसरें कोण तयार होणार ? पण रुस्तुम गेला कुठें ?

## : ६ :

## " रुस्तुम, आम्हांला मदत कर ! "

रुस्तुम एका रानांत स्वतंत्र राहुटी बांधून राहिला होता. पुत्र न झाल्यामुळें तो खट्टू झाला होता. शिवाय कैकॉस राजानें एकदां त्याचें मन दुखविले होतें. त्यामुळें तो राज्य सोडून दूर रहात होता. आज राजाला रुस्तुमची किंमत कळाली. त्यानें रुस्तुमला निरोप पाठविला.

जासूद निघाला. रुस्तुम वनांत हिंडत होता. त्याची गांठ पडली.

" नमस्कार रुस्तुम "

" कां आलांत आज. कांहीं विशेष ? "

" हें घ्या राजाचें पत्र. चला, रुस्तुम जनता तुमची वाट पहात आहे. "

रुस्तुमनें पत्र वाचले. त्यानें सर्व वृत्तान्त जाणला. तो जासूदाला म्हणाला,

" राजाला म्हणावे रुस्तुम येणार नाहीं. मी वृद्ध झालों आहे. मला मुलगा असतां तर तो उपयोगी पडला असता. "

" रुस्तुम असें करूं नका. सोराब निधड्या छातीचा वीर आहे. सर्व पर्शियन त्याच्यापुढें फिकें दिसत आहे. सर्व जनता तुमच्याकडे आशेनें पहात आहे. आम्हांला मदत करा नाहींतर पर्शिया हातचा जाईल."

" राजाला आज माझी आठवण झाली. स्वार्थी आहे तुमचा राजा. त्याला म्हणावे पर्शियाचें नांव तूंच राख. रुस्तुम मेला. "

" रुस्तुम तुम्ही थोर आहांत. तुम्हांला मी सांगावे असें नाहीं. राजाची चूक झाली म्हणून कां तुम्ही देशाला विसरणार ? यावेळीं राग बाजूला ठेवला पाहिजे. सोराब शूर आहे. सिंहाचा छावा आहे तो. पर्शिया

वृद्ध झाला तरी तो मागें सरत नाहीं हें दाखवा त्यांना. चला, तुम्ही आला नाहीं तर लोक म्हणतील, 'रुस्तुम घाबरला.' तुम्ही तुमच्या कीर्तीला कलंक लावूं नका. चला चला रुस्तुम, विचार करण्याची ही वेळ नाहीं. पर्शिया तुम्हांला हांका मारीत आहे."

जासूदाचे डोळे भरून आले. रुस्तुमचें अंतःकरण विरघळले. जासूदाबरोबर तो निघाला. राजानें त्याचें स्वागत केलें.

"रुस्तुम मला क्षमा करा. तुम्ही वृद्ध झालांत. तुम्हांवर आम्ही ही कामगिरी सोपविणें योग्य नाहीं. पण नाईलाज आहे माझा."

"राजा, मला मुलगा असतां तर......."

"नका. वाईट वाटून घेऊं नका. नशिबाच्या या गोष्टी. मग कळवूं ना शत्रूला कीं आमची तयारी आहे म्हणून !"

"कळवा. पण माझी एक अट आहे. मी म्हातारा झालों. मी पडलों तर माझ्या कीर्तीला कलंक लागेल. म्हणून माझें नांव जाहीर करू नका."

"ठीक आहे. जशी तुमची इच्छा."

शत्रूकडे कळविण्यांत आले. द्वंद्वयुद्धाची वेळ ठरली. कोणीतरी अनामिक द्वंद्वयुद्धास येत आहे असें कळविण्यांत आले.

: ७ :

## अनामक

इकडे सोराबनें कपडे चढविले. त्याला खूप आनंद झाला. आतां आपले वडील आपल्याला भेटतील. या कल्पनेंत तो गुंग होता. पण

योद्ध्याचें नांव न कळल्यामुळें तो जरा नाराज झाला. त्याला वाटलें 'कोण बरे असेल हा अनामिक ? बाबा तर नसतील ना ?'

युद्धाला निघण्यापूर्वी तो अफासिबकडे गेला. तो अफासिबला म्हणाला, "योद्ध्याचें नांव समजले कां ? बाबांना भेटावे म्हणून मी हें द्वंद्व-युद्ध ठरविले. पण हा कोणीतरी अनामिक आला. मला विजय मिळाला तरी त्या विजयाचा मला काय आनंद ? मला माझे बाबा पाहिजेत. मला कीर्ति नको. धन नको. कांहीं कांहीं नको मला."

"योद्धा कोण आहे ते कळत नाहीं. पण रुस्तुम पर्शियांतच आहे. तुझी कीर्ति ऐकून तो तुला भेटायला येईल. जा काळजी करूं नकोस. वेळ होत आली."

सोराब निघाला. ढाल, तलवार, गदा घेऊन तो निघाला. सैनि-कांनीं त्याच्या नांवाचा जयजयकार सुरू केला. नगारा वाजूं लागला.

दुसऱ्या बाजूनें रुस्तुम आला. त्याचा चेहरा उग्र वाटत होता. पुत्र नाहीं म्हणून तो दुःखी दिसत होता. म्हातारपणामुळें त्याचा उत्साह मावळून गेला होता. रक्षावर बसून तो येत होता. रक्षहि म्हातारा झाला होता.

दोन्ही वीर जवळ आले. सोराबनें प्रतिस्पर्ध्याकडे दृष्टी टाकून मंद स्मित केले आणि विचारले,

"आपलें नांव मला कळेल कां ?"

"सांगायचे असते तर आधींच सांगितले असते. तूं युद्धाला आला आहेस हें विसरूं नको. चल हो तयार !"

दोघेहि पुढें सरसावले. खडाजंगी सुरू झाली. एकमेकांवर वार होऊं लागले. कुणीच हरेना. तो सिंह होता आणि त्याचाच तो छावा !

अनामिक मेघाप्रमाणें गर्जना करीत होता तर सोराब विजेप्रमाणें निसटून जात होता. कोण जिंकणार आतां....! अरेरे पहा दोघांच्या तलवारी तुटल्या. रुस्तुमनें गदा उचलली.

" अरे चिमुरडया, थांब ही गदा घालतो तुझ्या डोक्यांत." रुस्तुम म्हणाला. सोराबच्या अंगावर तो धांवून गेला. पण सोराब हळूच निसटून गेला आणि रुस्तुम धाडकन् खालीं पडला. सोराबला ही संधी आयती चालून आली होती. पण त्यानें रुस्तुमवर वार केला नाहीं. तो त्याच्याकडे प्रेमानें पहात होता. तो त्याला म्हणाला,

" हे वीरा ऊठ. बेसावध असतां मी तुझ्यावर घाव घालणार नाहीं. तुला मारावें असें मला वाटत नाहीं. का बरें असें होत आहे? माझे हात जड झाल्यासारखे वाटतात."

रुस्तुमला वाटले हा पोऱ्या मला चिडवतो आहे. तो खळवळला. भाला सावरून तो उठला व त्यानें तो भाला सोराबला मारला तो सोराबच्या छातींत घुसला. तो खालीं कोसळला. वेलीवरची नाजूक कळी उमलण्याच्या आंतच गळून पडली. रुस्तुम सोराबजवळ आला. तो त्याला उपहासानें म्हणाला,

" पडलास ना पुरता? का येणार आहे बोल परत लढायला. घे ना माझा सूड. वीर आहेस ना तूं?"

" मी लढण्यास असमर्थ आहे. पण लक्षांत ठेव माझ्या मरणाचा सूड रुस्तुम घेईल " सोराब म्हणाला.

" कोण रुस्तुम ?"

" हो हो रुस्तुम. माझा जन्मदाता आहे तो. पुत्राचा वध करणाऱ्याचा तो सूड घेईल."

: ८ :

## पितापुत्र

" काय हें वेड्यासारखे बरळतो आहेस. रुस्तुमला मुलगा नाहीं हें तुला माहीत नाहीं कां ?" रुस्तुम म्हणाला.

" रुस्तुमचा मी मुलगा आहे. रुस्तुम माझा जन्मदाता आहे. मी देवाघरीं जात आहे. देवाघरीं जातांना का कोणी खोटें बोलेल ?" सोराबचा कंठ दाटून आला.

सोराब आपला मुलगा आहे या गोष्टीवर रुस्तुमचा विश्वास बसेना. त्याला वाटत होते आपल्याला मुलगा तर नक्की नाहीं. असली तर मुलगी असेल. इतक्यांत घायाळ होऊन पडलेला तो वीर म्हणाला--

" हे वीरा, तूं कोण आहेस ? माझ्यावर तुझा विश्वास बसत नाहीं कां ? जन्मभर मी कधीं खोटें बोललों नाहीं. मरतांना आतां खोटें बोलून मला काय मिळणार आहे ? तुम्हांला रुस्तुम भेटला तर त्याला सांगा कीं तुझा मुलगा तुझा शोध करीत होता. तुला हांका मारीत तो देवाकडे गेला. मी येथें कीर्ति मिळविण्यास आलों नव्हतों. माझ्या बाबांना भेटायला आलों होतों. हें काय ! तुम्ही असें रडतां काय ! तुम्ही रुस्तुमचे मित्र आहांत का ? रडूं नका. मी मरणार म्हणून रडतां पण मला जगून तरी काय करायचे ? पित्याशिवाय कसा जगूं मी ? त्याला जरूर जरूर माझा निरोप सांगा हं ! म्हणावे तुझा मुलगा वीराप्रमाणें लढून मेला."

रुस्तुमला कसलीशी आठवण झाली. तो सोराबला म्हणाला,

" तुझ्या आईनें तुझ्या दंडांत कसला ताईत बांधला आहे कां ?"

" हो ! आहे ना. आई नेहमीं म्हणे, बाळ तुझ्या पित्याची आठवण आहे ही " सोराब उत्तरला.

रुस्तुम सोराबजवळ गेला. मोठ्या आतुरतेनें त्यानें त्याच्या दंडावरचे कपडे दूर केले काय दिसले त्याला तिथें ? हो तोच ताईत ! हें काय ? रुस्तुम ओक्साबोक्सी रडूं लागला.

" बाळ, मीच तुझा पिता. पुत्राला पित्यानें मारले. अरेरे ! कसें हें माझ्या हातून घडले. खरेंच तूं सिंहाचा छावा होतास. रुस्तुमचा सोराब होतास. मुलगा नाहीं म्हणून इतकें दिवस मी दुःखी होतो. पण मींच तुझा घात केला. "

" बाबा ! रडूं नका जेव्हां मी तुम्हांला पाहिले तेव्हांच माझ्या हृदयानें आंतडें ओळखले. म्हणूनच मी तुमचें नांव विचारले. पण जें होणार आहे तें का झाल्याशिवाय टळेल ? जाऊं द्या तें. तुम्ही माझ्याजवळ या. माझें डोकें तुमच्या मांडीवर घ्या. रडूं नका. माझा पापा घ्या ना ! हं म्हणा, ' सोराब बाळ सोराब ' एवढी एकच इच्छा अपुरी राहिली आहे माझी. लहानपणीं मी तुमच्या अंगाखांद्यावर खेळलों नाहीं. तुमचा मार खाल्ला नाहीं. आतां मरणाच्या दारांत तरी मला पितृप्रेमाचा आनंद लुटूं द्या. तुम्ही भेटलांत. आशा सफल झाली. जें शोधत होतो तें सांपडले. "

रुस्तुमचें अंतःकरण दुःखानें भरून आले. त्याच्यानें बोलवेना. त्यानें सोराबचें डोकें मांडीवर घेतले. आपला थरथरता हात वात्सल्यानें त्याच्या अंगावरून फिरविला. त्याचा मुका घेतला. पित्याच्या डोळ्यांतील दोन अश्रू पुत्राच्या मुखावर पडले.

जवळच रक्ष उभा होता. तो अगदीं गांगरून गेला होता. शत्रू-साठीं रडणाऱ्या रुस्तुमबद्दल त्याला आश्चर्य वाटत होतें. रक्षाला पहातांच सोराब रुस्तुमला म्हणाला,

" बाबा, हा रक्षच ना ? याच्या कितीतरी गोष्टी आईनें मला सांगितल्या आहेत. हे रक्षा, धन्य आहे तुझी. माझ्या वडिलांचा सहवास तुला लाभला. पर्शियासाठीं तूं लढलास आणि मी........! अरेरे! मी मातृभूमीशीं लढलों. धिक्कार असो माझा. बाबा, भाला काढा. नाहीं मला आतां सहन होत. तुमच्या मांडीवर मरण आले. किती भाग्याची गोष्ट आहे."

रुस्तुमनें भाला काढला. रक्ताचें कारंज उसळले. सोराबचें पवित्र रक्त उसळून बाहेर आले. आणि त्याच्याबरोबरच सोराबचा आत्मा त्याच्या देहाला सोडून गेला.





IRBK-0102999
IRBK-0102999

# आमचें बाल-वाङ्मय

| | | |
|---|---|---|
| (१) | व्हेनिस [illegible] व्यापारी | ०—८—० |
| (२) | जसें [illegible]म्हांस आवडेल तसें | ०—६—० |
| (३) | अथेल्लो | ०—६—० |
| (४) | ॲन्टनी आणि क्लिओपात्रा | ०—६—० |
| (५) | आजकालचीं वाहनें | ०—६—० |
| (६) | आपलें जग | ०-१०-० |
| (७) | आपलें घर | ०-१०-० |
| (८) | सोराब आणि रुस्तुम | ०—५—० |

वरील सर्व पुस्तकें अल्पमोली, आकर्षक व आल्हाददायक अशीं आहेत. आठ पुस्तकांचा गट एकदम घेणारास ट. ख. सह दोन रुपये आठ आणे पडतील. हीं सारीं पुस्तकें आबाल-वृद्ध स्त्री-पुरुष मोठ्या आवडीनें वाचतात. आपणहि हीं पुस्तकें मागवून मनमुराद आनंद लुटा.

---

जगताप पब्लिशिंग हाउस, पुणें २

किंमत ५ आणे